महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत, तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,मुंबई ४०० ०१९
email : agmhrom@gmail.com | website :www.mahadiscom.in
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१ | फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासंवि/रवका/न.क्र.३४८/२५८३६ | दिनांक : १६.०९.२०१९

**E-mail द्वारे रवाना**

**प्रति,**

१) सहा. व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. औरंगाबाद / कल्याण.
२) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. पुणे / नागपूर.
३) सर्व मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या.,परिमंडळ कार्यालय.

**विषय :- भूकंपग्रस्तांसाठी लागू करण्यात आलेल्या २ % समांतर आरक्षण व इतर समांतर आरक्षण घटकांची राज्यात काटेकोरपणे अंमलबजावणी करणेबाबत.**

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण १११८/प्र.क्र.३३२/१६-अ दि.०६.०९.२०१८.

उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांनी भूकंपग्रस्तांसाठी लागू करण्यात आलेल्या २ % समांतर आरक्षण व इतर समांतर आरक्षण घटकांची राज्यात काटेकोरपणे अंमलबजावणी करणेबाबत, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण १११८/प्र.क्र.३३२/१६-अ दि.०६.०९.२०१८ जारी केला आहे. दिनांक ०६.०९.२०१८ ची संदर्भिय महाराष्ट्र शासन परिपत्रकाची प्रत यासोबत माहितीस्तव जोडण्यात येत आहे.

२. सांघिक कार्यालय तसेच सर्व क्षेत्रीय कार्यालयातील नियुक्ती अधिकारी / प्राधिकारी यांना विनंती करण्यात येते की, कंपनीमध्ये सरळसेवा प्रवेशासाठी भूकंपग्रस्तांना, प्रकल्पग्रस्तांना, माजी सैनिक, महिला, दिव्यागं (अपंग), खेळाडू व अनाथांना, समांतर आरक्षण देण्यात आले आहे. सदर विहित केलेल्या प्रमाणानुसार पदांची गणना करून उक्त समांतर आरक्षणाची संदर्भीत शासन परिपत्रका मधील सुचनांनुसार काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

सोबत : संदर्भीत शासन परिपत्रक

**(कमांडर शिवाजी इंदलकर) (से.नि.)**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

**प्रत सस्नेह रवानः-**
मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ), म.रा.वि.वि.कं.मर्या., प्रकाशगड, मुंबई.

**प्रत रवानाः-**
१) महाव्यवस्थापक (मासं), म.रा.वि.वि.कं.मर्या., प्रकाशगड, मुंबई.
२) सहा. महाव्यवस्थापक (मासं-सेप्र), म.रा.वि.वि.कं.मर्या., धारावी, मुंबई.
३) सर्व अधिक्षक अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या., मंडळ कार्यालय.
४) सर्व कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या., विभागीय कार्यालय.

**भूकंपग्रस्तांसाठी लागू केलेल्या २ % समांतर आरक्षणाची तसेच इतर समांतर आरक्षण घटकांची राज्यात कोटकोरपणे अंमलबजावणी करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण १११८/प्र.क्र.३३२/१६-अ**

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ६ सप्टेंबर, २०१८.

वाचा -

१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. भूकंप १००९/प्र.क्र.२०७/२००९/१६-अ, दि. २७ ऑगस्ट, २००९.
२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. संकीर्ण १११४/प्र.क्र.२५२/१६-अ, दि. २० जुलै २०१५.

प्रस्तावना -

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि. २७ ऑगस्ट, २००९ अन्वये राज्यातील भूकपग्रस्तांना शासकीय सेवेतील गट-क व गट-ड च्या पदांवर स्वतंत्रपणे २ % समांतर आरक्षण लागू करण्यात आले आहे. सदर आरक्षण हे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अखत्यारीतील पदांना लागू नाही. राज्यातील विविध आस्थापना गट-क व गट-ड या पदांकरीता निवड प्रक्रिया राबविताना भूकंपग्रस्तांचे २ % आरक्षण काटेकोरपणे लागू करत नाहीत, अशा तक्रारी शासनास प्राप्त झालेल्या आहेत.

भूकंपग्रस्तां व्यतिरिक्त राज्यात प्रकल्पग्रस्तांना ५ %, माजी सैनिक १५ %, महिला ३० %, अपंग ३ %, खेळाडू ५ %, अंशकालीन पदवीधर/ पदविकाधारक १० %, अनाथ १ % या समांतर आरक्षणाच्या घटकांना आरक्षण विहित करण्यात आले आहे. या सर्व घटकांची देखील विहित केलेल्या आरक्षणाप्रमाणे पदभरती होणे आवश्यक आहे.

**शासन परिपत्रक -**

राज्य शासकीय सेवेतील गट-क व गट-ड ची पदे भरताना सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी भूकंपग्रस्तांसाठी असलेल्या २ % आरक्षणाची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

याव्यतिरिक्त शासकीय सेवेत प्रवेशासाठी प्रकल्पग्रस्तांना ५ %, माजी सैनिक १५ %, महिला ३० %, अपंग ३ %, खेळाडू ५ %, अंशकालीन पदवीधर/पदविकाधारक १० %, अनाथ १ % यांना समांतर आरक्षण देण्यात आले आहे. सदर विहित केलेल्या प्रमाणानुसार पदांची गणना करून त्यानुसार नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी पदभरती करावी. उक्त समांतर आरक्षणाची नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

या परिपत्रकातील सूचना शासकीय /निमशासकीय सेवा, शासनाचे उपक्रम, महामंडळे, मंडळे, शासन अनुदानित संस्था व ज्यांना मार्गदर्शक सूचना देण्याचे अधिकार शासनाला आहेत अशा सर्व संस्था व सेवा यामधील नियुक्त्यांसाठी लागू राहतील. सदर सूचना प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुखांच्या निदर्शनास आणाव्यात.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१८०९०६१७१५५७८८०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Tikaram Waman Karpate

Digitally signed by Tikaram Waman Karpate
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c97a9d6b23c34fddbfe8f6f6189c08328de56af131faf7d6c0a149c3a4cf1436, cn=Tikaram Waman Karpate
Date: 2018.09.06 17:20:07 +05'30'

**(टि. वा. करपते)**

उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
३. सर्व मा. मंत्री / मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
४. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, विधानभवन, मुंबई
५. सर्व मा. संसद सदस्य / मा. विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य
६. मा. मुख्य सचिव यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई
७. सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव व सचिव
८. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, मुंबई
९. प्रबंधक, उच्च न्यायालय मूळ शाखा, मुंबई/औरंगाबाद /नागपूर
१०. प्रबंधक, उच्च न्यायालय अपिल शाखा, मुंबई/औरंगाबाद /नागपूर
११. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई/औरंगाबाद /नागपूर
१२. प्रबंधक, लोक आयुक्त व उपलोक आयुक्त, मुंबई
१३. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग
१४. सचिव, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई
१५. सचिव, राज्य माहिती आयोग, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई
१६. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा, महाराष्ट्र, मुंबई /नागपूर
१७. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई (प्रसिद्धीकरिता ५ प्रती)
१८. मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख /कार्यालय प्रमुख
१९. सर्व विभागीय आयुक्त / सर्व जिल्हाधिकारी
२०. सर्व महानगर पालिकांचे आयुक्त
२१. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
२२. सर्व मुख्याधिकारी, नगर परिषदा / नगरपालिका
२३. राज्यातील सर्व महामंडळे, मंडळे आणि सार्वजनिक उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक
२४. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई ( १० प्रती)
२५. सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांची मध्यवर्ती कार्यालये, महाराष्ट्र राज्य
२६. सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने / निवड नस्ती / १६-अ